# राज्य माहिती आयोग, नाशिक खंडपीठ

(पिनॅकल मॉल,४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)

---

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपिल क्र. रामाआ/नाशिक/व्दितीय अपिल क्र. १३६९/२०१९/धुळे**

| अपिलार्थी | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
| श्री. ईश्वर बाजीराव राणे, रा. रामद्वार पार्क, फ्लॅट नं. १५/३, गुजराल पेट्रोल पंपामागे, निमखेडी शिवार, पो. पिंप्राळा, ता. जि. जळगांव. | लेखा अधिकारी, लेखा शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, धुळे, ता. जि. धुळे. | तहसिलदार (आस्थापना शाखा), जिल्हाधिकारी कार्यालय, धुळे, ता. जि. धुळे. |

**व्दितीय अपिल सुनावणी दिनांक - २७/०३/२०२३**

| मुळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| २५/०१/२०१९ | १८/०२/२०१९<br>२१/०२/२०१९ | ०६/०३/२०१९ | ---- |

अपिलार्थी यांनी दि. २०/०५/२०१९ रोजीच्या अर्जान्वये कलम १९(३) अन्वये व्दितीय अपिल अर्ज दाखल केला आहे.

सदर व्दितीय अपिलाच्या सुनावणीस अपिलार्थी वगळता सर्व पक्षकार उपस्थित होते.

सुनावणीदरम्यान विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांचे दिनांक २४/०३/२०२३ रोजीचे लेखी निवेदन आयोगास सादर केले. सदर निवेदनात अपिलार्थीने नमूद केले आहे की, "माझ्या दिनांक २५/०१/२०१९ रोजीच्या माहिती अर्जान्वये मागितलेली सेवानिवृत्तीचे लाभ व रजा रोखीकरण याबाबत मागितलेली माहिती मिळाली आहे. माझ्या मुळ माहिती अधिकार अर्जावर जिल्हाधिकारी कार्यालय, धुळे यांच्याकडुन योग्य ती कार्यवाही झालेली आहे. त्यामुळे द्वितीय अपील चालविण्याचे कारण उरलेले नाही याबाबत माझी कुठलीही तक्रार नसल्याने द्वितीय अपील चालविण्यात येऊ नये" अशी विनंती केली आहे.

सबब, अपिलार्थी यांच्या उपरोक्त नमूद लेखी निवेदनाच्या अनुषंगाने आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(समीर सहाय)**
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नाशिक

---

जावक क्र. आ-९४८३ दि. ०६/११/२०२३